Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies
Online ISSN 2278-8808, SJIF 2026 = 8.727
https://www.srjis.com/issues_data/304
Peer Reviewed & Refereed Journal, SEPT-OCT 2026, Vol- 15/97

ईव्हीएमचे चारित्र्य : भारतीय निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा प्रश्न

शरद खेडकर
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, के. जे. सोमय्या महाविद्यालय, कोपरगाव

Paper Received On: 1 OCT 2026
Peer Reviewed On: 16 OCT 2026
Published On: 01 NOV 2026

प्रस्तावना:

"मतपत्रिकेच्या माध्यमातून निवडणुका घेण्याची मागणी रास्त नाही. पण वर्तमान ईव्हीएम पद्धतीवर डोळे झाकून विश्वास ठेवता येणार नाही. ईव्हीएमबाबत निर्माण होणा-या शंका वेळीच दुरुस्त करणे आवश्यक आहे. पारदर्शकतेमुळे ईव्हीएमवरील विश्वास दृढ होईल. आणि पारदर्शकता ही एकदाच करुन ठेवण्यासारखी गोष्ट नसून ती निरंतर चालणारी प्रक्रिया आहे."

या वर्षी मे महिन्यात पार पडलेल्या प. बंगाल विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशीनचा मुद्दा पुन्हा चर्चेत राहिला. या निवडणुकीत देखील संपूर्ण मतदान पावत्यांच्या गणनेची मागणी करण्यात आली होती. परंतु निवडणूक आयोगाने यावेळी देखील सदर मागणीला फेटाळून लावले. तसेच आयोगाने ही मागणी फेटाळताना 2024 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भातील याचिकेवर दिलेल्या निर्णयाचा दाखला दिला. 2024 मध्ये "असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म" या संघटनेसह इतरांनी सर्वोच्च न्यायालयात इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन (ईव्हीएम) अर्थात, मतदान यंत्रांच्या वापरासंदर्भात याचिका दाखल केल्या होत्या. यामध्ये मतदान केल्यानंतर शेजारील व्हीव्हीपॅट बॉक्स मधील मतदार पावतीची मतदान यंत्रातील मतमोजणी सोबत शंभर टक्के पडताळणी करण्यात यावी. तसेच मतदान यंत्राऐवजी पूर्वीप्रमाणे मतपत्रिकेच्या माध्यमातून निवडणुका घेण्याचे निर्देश न्यायालयाने द्यावेत, अशी मागणी करण्यात आली होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाने सर्व याचिका फेटाळून लावत ईव्हीएमवर विश्वास दर्शवला होता. त्यासोबतच न्यायालयाने निवडणूक आयोगाला काही निर्देश दिले होते.

भारतात 1957 च्या सार्वत्रिक निवडणुकांपासून मतदान केंद्र ताब्यात घेण्याचे प्रकार सुरू झाले. भारतीय राजकारणात "मसल पॉवर"चा हा पहिला अविष्कार होता. मतदारांना धमकावणे, मतपत्रिकेच्या पेट्या पळवून नेणे इ. गैरप्रकार सातत्याने होऊ लागले. यावर उपाय म्हणून ईव्हीएमचा प्रयोग करण्यात आला. ईव्हीएममुळे मतपत्रिका छपाईवर होणारा खर्च वाचला. एका लोकसभा निवडणुकीसाठी मतपत्रिका तयार करताना तब्बल दहा हजार टन कागदाची आवश्यकता भासे. तो कागद देखील वाचला आणि त्यासाठी होणारी वृक्षतोड देखील थांबली. ईव्हीएममुळे मतमोजणी वेगाने होऊ लागली. मतपत्रिकेवर शिक्का मारण्याऐवजी फक्त चिन्हासमोरील बटण दाबायचे असल्यामुळे मतदान प्रक्रिया फार सोपी झाली. ईव्हीएममध्ये एका वेळी एकदाच बटण दाबून मत देता येते. त्यामुळे बनावट मतदानाचे प्रकार बऱ्यापैकी कमी झाले. एक ईव्हीएम जवळपास 15 वर्षांपर्यंत वापरता येऊ शकते. "भारत इलेक्ट्रॉनिक्स लि." व "इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया" या सार्वजनिक क्षेत्रातील दोन कंपन्या ईव्हीएम ची निर्मिती करतात. ईव्हीएम हा भारतीय निवडणूक प्रक्रियेच्या वाटचालीतील मैलाचा दगड ठरला आहे.

Copyright © 2026, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

संशयाचा धूर:

2009 च्या लोकसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदाच ईव्हीएम बाबत संशयकल्लोळ सुरू झाला. तेव्हाच्या निवडणुकीत सत्ता मिळवण्यात अपयशी झालेल्या भाजप नेते लालकृष्ण अडवाणी यांनी ईव्हीएम मध्ये फेरफार व गडबड होत असल्याचा आरोप केला. या कथित गडबडीविरोधात जनता पक्षाचे अध्यक्ष डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. 2013 मध्ये "डॉ. सुब्रमण्यम स्वामी विरुद्ध निवडणूक आयोग" या खटल्याचा निकाल देत न्यायालयाने "मतदार पडताळणीयोग्य पावती" अर्थात, व्हीव्हीपॅट उपलब्ध करून देण्याचा निवडणूक आयोगाला आदेश दिला. "मुक्त व न्याय निवडणूक प्रक्रियेसाठी मतदान पावती अनिवार्य आहे", असे सर्वोच्च न्यायालयाने उद्गार काढत निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचे महत्त्व अधोरेखित केले होते. 2019 च्या निवडणुकीपासून सर्व मतदारसंघात व्हीव्हीपॅट बॉक्स ईव्हीएमला जोडण्यात आले. मतदान केल्यानंतर या पावतीवर उमेदवाराचे नाव व चिन्ह छापून येते. ही पावती मतदाराला सात सेकंदापर्यंत दिसते व नंतर ती बॉक्समध्ये पडते.

परंतु 2015 नंतर पुन्हा ईव्हीएमबाबत संशयाने उचल खाल्ली. जून 2017 मध्ये निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना ईव्हीएम हॅक करुन दाखवण्याचे आव्हान दिले होते. त्यामध्ये फक्त राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांनी सहनभाग घेतला. या हॅकेथॉन साठी आयोगाने विविध अटी ठेवल्या होत्या. त्यामुळे आम आदमी पक्षाने ही धूळफेक असल्याची आयोगावर टीका केली होती. त्यामुळे ईव्हीएमबाबत असणारा संशय कायम राहिला.

ईव्हीएम मध्ये मतदान यंत्र, कंट्रोल युनिट व व्हीव्हीपॅट बॉक्स अशी तीन उपकरणे असतात. मतदान यंत्रावर एखाद्या उमेदवारसमोरील बटन दाबल्यानंतर कंट्रोल युनिटला संदेश जातो. कंट्रोल युनिट व्हीव्हीपॅटला पावती छापण्याचा आदेश देते. पावती छापल्यानंतर तसा संदेश कंट्रोल युनिटला जातो व मतदान पूर्ण होते. निवडणूक सुधारणांसाठी आग्रही असणाऱ्या नागरी समाजाला व्हीव्हीपॅटने कंट्रोल युनिटला दिलेल्या संदेशाबाबत संशय वाटतो. ज्या उमेदवाराच्या नावे पावती छापली गेली त्याच उमेदवाराच्या चिन्हाचा संदेश व्हीव्हीपॅट बॉक्सकडून कंट्रोल युनिटला जातो का ? याबाबत त्यांना शंका आहे. या संदर्भात प्रसिद्ध सॉफ्टवेअर तज्ञ माधव देशपांडे यांनी विस्तृत तांत्रिक विश्लेषण केले आहे. यापूर्वी 2019 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील यादृच्छिक पद्धतीने कोणत्याही पाच मतदान केंद्रावरील ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यांची पडताळणी करण्याचे आदेश दिले होते. त्याऐवजी मतदान पावत्या आणि ईव्हीएम मधील मतमोजणी यांची 100% पडताळणी करण्याची मागणी याचिकेतून करण्यात आली होती.

न्यायालयीन निर्देश:

न्यायालयाने हा निकाल देताना व्हीव्हीपॅट बॉक्समध्ये उमेदवाराचे नाव व चिन्ह अपलोड करणारे "सिम्बॉल लोडिंग युनिट" हे अपलोडींगनंतर सीलबंद करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच ज्या पाच ईव्हीएमची पडताळणी केली जाते, त्याबाबत दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावरील उमेदवाराला आक्षेप घेण्याचा अधिकार दिला आहे. परंतु या ईव्हीएमची तपासणी करण्याचा अधिकार उत्पादन कंपन्यातील अभियंत्यांना असेल. म्हणजे ज्यांनी ईव्हीएम ची निर्मिती केली त्यांनाच स्वनिर्मित मशीन तपासणी करता येईल. हा आदेश म्हणजे हितसंबंध संघर्षाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. न्यायालयाने मतदान पावत्यांवर बारकोड लावून त्याची यंत्राद्वारे मोजणी करता येईल, का ते पहा, अशी निवडणूक आयोगाला सूचना केली आहे. परंतु हा काही आदेश नव्हे. निवडणूक आयोगाची वर्तमान कार्यप्रणाली पाहता आयोग ही सूचना कितपत अमलात आणेल, याबाबत शंकाच आहे.

शेवटी ईव्हीएम देखील मानवनिर्मितच आहे. त्यामध्ये त्रुटी असू शकतात. त्या दूर करण्यासाठीच तर 100% पडताळणीची मागणी होत आहे. सुरुवातीच्या काळात मतपत्रिका पेट्या पळवण्याचे प्रकार हा दृश्य स्वरूपातील दोष होता. त्यावर मात करण्यासाठी ईव्हीएम आणण्यात आले. ईव्हीएम बाबत असणारी फेरफार अदृश्य स्वरूपाची आहे. त्याबाबत संशय असेल तर तो पडताळणी करून शोधणे आवश्यक नाही का ? 2013 मध्ये ईव्हीममध्ये गडबडीचे कोणतेही ठोस पुरावे समोर नसताना देखील न्यायालयाने पारदर्शकतेच्या दृष्टिकोनातून ईव्हीएमवर विश्वास दृढ व्हावा यासाठी व्हीव्हीपॅटचे आदेश दिले. 2013 मध्ये सामान्य जनतेच्या ईव्हीएम बाबत फार शंका नव्हती. आता मात्र सामान्य मतदाराच्या मनात हा संशय वेगाने वाढत आहे. मग याच व्हीव्हीपॅट मोजणीसाठी न्यायालय का तयार नाही

Copyright © 2026, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

? न्यायालयाचे म्हणणे असे, की ईव्हीएमला होणारा आंधळा विरोध विनाकारण संशय निर्माण करतो. हे बरोबरच. परंतु रास्त व तर्काधारित संशय उत्पन्न होत असताना ईव्हीएमवर विश्वास दाखवणे हे आंधळ्या विश्वासाचे निदर्शक नाही का ? व्हीव्हीपॅटमुळे ईव्हीएमच्या पारदर्शकतेचा एक टप्पा पार पडला. आता व्हीव्हीपॅटची पडताळणी करून पारदर्शकतेचा दुसरा टप्पा पूर्ण करायला नको का ?

व्हीव्हीपॅट मधील पावत्यांच्या मतमोजणीमुळे निकालास चार-पाच दिवस विलंब होईल, असे 2024 चा निर्णय देताना न्यायालयने आपले मत नोंदवले होते. 2024 च्या लोकसभा निवडणुकीतील मतदानाचा पहिला टप्पा 19 एप्रिल रोजी पार पडला होता. अंतिम निकाल चार जून रोजी आला. व्हीव्हीपॅट पडताळणीमुळे फार तर आठ जूनला निकाल जाहीर झाला असता. या पडताळणीमुळे ईव्हीएम वरील नागरिकांचा विश्वास वृद्धिंगत होणार असेल तर चार दिवसांचा विलंब ही काही मोठी बाब नाही.

26 एप्रिल 2024 रोजी न्यायालयाचा सदर याचिकेवरील निकाल आला त्याच दिवशी महाराष्ट्रात यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव येथील एका मतदान केंद्रावर व्हीव्हीपॅट मध्ये गडबड झाल्याचे दिसून आले होते. त्या केंद्रावर एका चिन्हाला दिलेले मत दुसऱ्या चिन्हाला जात असल्याचे दिसून आले. मतदारांच्या तक्रारीनंतर तहसीलदारांनी संबंधित यंत्र बदलले. ईव्हीएम मशीन 100 टक्के निर्दोष नसल्याचा हा ढळढळीत पुरावा होता. तसेच यावर्षी झालेल्या प.बंगालमधील विधानसभा निवडणुकीनंतर मतदान प्रक्रियेत वापरलेले ईव्हीएम मशीन्स ज्या गोदामात ठेवण्यात आले होते, त्या गोदामाला जून महिन्यात आग लागली. या आगीत ईव्हीएम मशीन्स, त्याचे कंट्रोल युनिट्स, बॅलट युनिट्स ही महत्त्वाची यंत्रे जळून नष्ट झाली किंवा त्यांचे नुकसान झाले. ईव्हीएम संदर्भात आधीच संशय व्यक्त होत असताना ही घटना या संशयाला बळ देणारी ठरते. शिवाय आगीसंदर्भात प्रसारमाध्यमांनी बाळगलेले मौन काही तरी वेगळेच सूचित करणारे ठरले.

अर्थात, कोणतीही प्रक्रिया पूर्णत: निर्दोष नसते. त्यात वेळोवेळी सुधारणा करावी लागते. ज्याप्रमाणे ज्युलियस सिझरच्या पत्नीचे चारित्र्य निष्कलंक हवे, त्याचप्रमाणे लोकशाहीत निवडणुकीसारख्या अतिशय महत्त्वाच्या प्रक्रियेतील ईव्हीएमचे चारित्र्य देखील संशयातीतच हवे. तूर्तास, आपण ईव्हीएमला निष्कलंक बनवण्याची संधी गमावली आहे, असे वाटते.

संदर्भ -

Association for Democratic Reforms v. Election Commission of India & Anr., Writ Petition (Civil) No. 434 of 2023.

www.eci.gov.in

2021, A look inside the electronic voting machine, THE HINDU, 4 December.

Ashraf Syed, 2024, Election With EVM Is Not Fair Unless...., 29 November, www.rediff.com

मराठी वृत्तपत्रे– सकाळ, लोकसत्ता.

Copyright © 2026, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies